**बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ माहे जुलै २०११**
**कक्ष – २, गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.अ.वि., मुंबई**
**आग्रीपाडा पो. ठाणे**
**गु.र.क्र १२७/११ कलम ३०७,३४ भादवि सह ३,२५,२७ भा.ह.का.**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | गु.र.क्र व कलम | – | आग्रीपाडा पो ठाणे गु.र.क्र १२७/११<br>कलम ३०७, ३४ भादवि सह २,२५,२७ भा.ह.का. |
| २) | गु.घ.दि व वेळ | – | दिनांक २२.०६.२०११ रोजी १६.४५ वा. |
| ३) | गुन्हा उघडकीस | – | दिनांक २५.०७.२०११ रोजी २२.१० वा. |
| ४) | फिर्यादी | – | इस्माईल सुलेमान शहा वय ५१ वर्षे, (गुन्हयाचा प्लानर)<br>(फिर्यादीच आरोपी) |
| ५) | आरोपी अटक | – | १) लक्ष्मण शंकर कुरमे उर्फ घाटया वय ३५ वर्षे<br>२) बबन पिटया गंगावणे वय ३९ वर्षे,<br>३) सुभाष रामचंद्र आडीवरेकर उर्फ तात्याटोपी वय ४४ वर्षे<br>४) सुरेद्रसिंग कमलसिंग रावत उर्फ टुरि वय ४२ वर्षे<br>५) इस्माईल सुलेमान शहा वय ५१ वर्षे (फिर्यादी) |

**गुन्हयाची हकिगत** –यातील श्री. इस्माईल सुलेमान शहा वय ५१ वर्षे रा.ठि. प्लॉट क्र. ८०३, सी विंग, टोपाझ को ऑ हौ.सोसायटी, डॉ. नायर रोड, आग्रीपाडा मुंबई–११ यांचे हौसिंग सोसायटीत पुर्नविकासाचे काम चालू आहे. इस्माईल शहा हे सोसायटीचे सदस्य असून पुर्नविकासावरुन विकासक बिल्डर व चिफ प्रमोटर यांचेशी वाद आहे. त्यावरुन सदस्य इस्माईल हे अनेक वेळा वेगवेगळया कारणावरुन बिल्डर व चिफ प्रमोटर यांना अडचणीत आणण्याची संधी सोडत नव्हते.

इस्माईल शहा यांचेशी विकासक बिल्डर व चिफ प्रमोटर हे जुळवून घेत नाहीत हे इस्माईल शहा यांचे लक्षात आल्याने त्यांनी विकासक बिल्डर व चिफ प्रमोटर यांना अडचणीत आणण्याचे हेतूने प्रेरीत होवून ओळखीच्या भाडोत्री गुंडाकरवी सुपारी देवून स्वत:वर बनावट गोळीबार करुन घेतला व पोलीस ठाणेस जावून,''माझेवर गोळीबार झाला असून सदर जीवघेण्या हल्यात मी सुदैवाने वाचलो'' अशी बतावणी करुन आग्रीपाडा पो. ठाणे येथे वरीलप्रमाणे खोटी फिर्यादी दिली.

गुन्हे प्रकटीकरण शाखेचे वपोनि निशिकांत पाटील व पथकाने सदर गुन्हयाचा समांतर तपास हाती घेवून इस्माईल शहा यांचेविषयी माहिती गोळा केली असता ताडदेव पोलीस ठाणेत त्यांचेविरुध्द पुर्वी गुन्हा नोद असल्याची व तो संघटित गुन्हेगार टोळयांशी सबंधीत

असल्याची माहिती मिळाली. नमूद पथकाने तो दुवा पकडून आरोपी लक्ष्मण शंकर कुरमे उर्फ घाटया व त्याचे इतर साथिदार बबन पिटया गंगावणे, सुभाष रामचंद्र आडीवरेकर उर्फ तात्याटोपी, सुरेद्रसिंग कमलसिंग रावत उर्फ टुरि याचे हालचालीवर लक्ष ठेवून यांना दिनांक २५.०७.२०११ रोजी ताब्यात घेतले. चौकशीअंती केलेल्या तपासामध्ये फिर्यादी (नंतर आरोपी क्र ५ म्हणून सबांधेलेला) याने सुभाष आडीवरेकर उर्फ तात्या टोपी यास रुपये ५ लाखाची सुपारी देवून स्वत:चे वैयक्तिक फायदयासाठी नमूद गुन्हा घडवून आणल्याचे निष्पन झाले.

अटक करण्यात आलेले चारही आरोपी हे पुर्वाश्रमीचे गवळी टोळीचे आहेत. त्याचेकडून अग्निशस्त्र व चॉपर अशी हत्यारे हस्तगत केली.

एकदरीत कक्ष—२, गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.अ.वि., मुंबईच्या नमुद पथकाने पोलीस कर्तव्यातील गुन्हे तपासाचा व्यवसायीक कस लावून सदरच्या अतिशय कठिण, किचकट रचलेल्या गुन्हयाची कौशल्याने उकल केल्याने **मा.पोलीस आयुक्तांनी** त्यांना **जुलै २०११** चे **बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ** अर्थात उत्कृष्ठ गुन्हेशोधाचे पारितोषिकाने सन्मानित केले आहे.

## तपास पथकातील अधिकारी व अंमलदार

१) स.पो.आ. अशोक दुराफे /स.पो.आ. डी—१(विशेष),गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई.

२) पो.नि. पाटील / कक्ष—२, गु.प्र.शा, गु.अ.वि., मुंबई

३) पो.नि. बसवंत/ कक्ष—२, गु.प्र.शा, गु.अ.वि., मुंबई

४) पो.उ..नि. मसवेकर/ कक्ष—२, गु.प्र.शा, गु.अ.वि., मुंबई

५) पो.उ.नि. तावडे / कक्ष—२, गु.प्र.शा गु.अ.वि., मुंबई

६) पो.ह.क्र १०११६/ कक्ष—२, गु.प्र.शा, गु.अ.वि., मुंबई

७) पो.ह.क्र १०७०/ कक्ष—२, गु.प्र.शा, गु.अ.वि., मुंबई

८) पो.ना.क्र २४६२३/ कक्ष—२, गु.प्र.शा, गु.अ.वि., मुंबई

९) पो.ना.क्र ११९४७/ कक्ष—२, गु.प्र.शा, गु.अ.वि., मुंबई

१०) पो.शि.क्र ३१३४३/ कक्ष—२, गु.प्र.शा, गु.अ.वि., मुंबई

११) पो.शि.क्र ३१४७५/ कक्ष—२, गु.प्र.शा, गु.अ.वि., मुंबई

१२) पो.शि.क्र ३२९४६/ कक्ष—२, गु.प्र.शा, गु.अ.वि., मुंबई

१३) पो.शि.क्र ०७—०१६०/ कक्ष—२, गु.प्र.शा, गु.अ.वि., मुंबई